बडनेरात शिवशाही बसला आग

बसचे लायनर जाम, टायर फुटल्यानंतर लागली आग

विनावाहक शिवशाही बस ही अकोला ते नागपूर या फेरीवर असताना बडनेरा पोलिस ठाण्यासमोर बसचे लायनर जाम होऊन चालक बाजूचे मागील साईडचा टायर फुटला. त्यामुळे बसने अचानक पेट घेतला. त्यांनतर सदर घटना लक्षात आल्यावर चालकाने बस थांबवून बसमध्ये असलेल्या अग्निशमन उपकरणाचा वापर करून आग विझवण्याचा प्रयत्न केला व आजूबाजूच्या लोकांना सहकार्य मागितले. त्यानंतर या घटनेची माहिती बडनेरा पोलिस स्टेशनला दिली. घटनास्थळी विभाग नियंत्रक निलेश बेलसरे, बडनेरा आगार व्यवस्थापक वैशाली मानव भाकरे, दक्षता अधिकारी जीवन वानखडे व उपयंत्र अभियंता अंबुलकर उपस्थित होते.

सुदैवाने जीवीतहानी टळली

महासागर प्रतिनिधी अमरावती, (दि. 11) – बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आरडीआयके कॉलेजच्या समोर शुक्रवारी सकाळी 10.15 वाजताच्या सुमारास शिवशाही बसचा टायर फुटल्यानंतर आग लागल्याने खळबळ उडाली होती. सुदैवाने बसचालक तत्परतेने बसखाली उतरले, त्यामुळे जीवीतहानी टळली. नागपूर 2 गणेशपेठ आगाराची शिवशाही बस क्रमांक एमएच 06 बी डब्लू 0903 ही अकोला ते नागपूरकडे जात होती.

विना वाहक व विना प्रवाशी असलेली ही बस बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आरडीआयके कॉलेजच्या समोरून जात असताना, अचानक बसचा टायर फुटला आणि बसला आग लागली. त्यामुळे खळबळ उडाली होती. आग लागल्याचे समजताच चालक राजेंद्र अजाबराव लासुरकर यांनी बस थांबविली. त्यानंतर चालक व वाहक खाली उतरले. त्यानंतर आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. या घटनेच्या माहितीवरून अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले. या आगीत राज्य परिवहन मंडळाचे अंदाजे 4 लाखांचे नुकसान झाले आहे.

अजय वानखडे हत्याप्रकरणातील फरार आरोपीही अटकेत

गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कारवाई

महासागर प्रतिनिधी अमरावती, (दि. 11) – बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या अजय वानखडे हत्याप्रकरणातील एका फरार आरोपीला अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने शुक्रवारी यश मिळाले. रोहन जितेन्द्र सयाम (20, रा. हनुमान मंदीरजवळ, चिचफैल) असे आरोपीचे नाव आहे.

प्रेमराज उर्फ मोंटी अनिल गोले याच्या हत्याप्रकरणात 6 ऑक्टोबर रोजी अजय विजयराव वानखडे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर बडनेरा पोलिस ठाण्यात अजय वानखडे याच फिर्यादीची बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत हत्या करण्यात आली. या गुन्ह्यातील पाहीजे असलेला आरोपी रोहन सयाम हा

घटनेच्या दिवसापासून फरार होता, तो अमरावती सोडून बाहेरगावी कुठे तरी राहत असल्याची गुप्त माहीती पोलिसांना मिळत होती, परंतू तो नेमका कुठे राहत आहे, याबाबत माहीत मिळत नव्हती. परंतू दरम्यान 11 ऑक्टोबर रोजी आरोपी रोहन हा चिचफैल भागात आल्याची माहीती पोलिसांना प्राप्त झाली. त्यानंतर पोलिसांनी रोहन जितेन्द्र सयाम ताब्यात घेवून पुढील कार्यवाहीसाठी सिटी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात दिले. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, जयदत भवंर यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्रमांक 1 चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे, पीएसआय प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमूख, फिरोज खॉन, अलीमउददीन खतीब, पोलीस अमंलदार नाझीमउददीन सैयद, विकास गुडदे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, अमोल मनोहर, रोशन माहुरे, किशांर खेंगरे तसेच सायबर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरिक्षक अनिकेत कासार, पोलीस अमलदार निखील माहूरे, अनिकेत वानखडे यानी केलेली आहे.

कापुर तलावात बुडून भाविकाचा मृत्यू

मृतदेह बाहेर काढण्यात शुक्रवारी मिळाले यश

महासागर प्रतितिनधी मोर्शी (दि. 11) – पिंगळादेवी गडावर दर्शनासाठी आलेल्या एका युवकाचा कापूर तलावात बुडून मृत्यू झाला. ही घटना 10 ऑक्टोंबर रोजी दुपारी 12 वाजताचे सुमारास घडली. ओमप्रकाश मुंदाने (21, रा.विचोरी) असे मृतकाचे नाव आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापनाच्या चमुने शुक्रवारी मृतदेह बाहेर काढण्यात यश मिळविले.

पोलीस सूत्रांनुसार मोर्शी तालुक्यातील गोराळा येथील प्रसिद्ध पिंगळा देवीचे मंदिर असून या ठिकाणी नवरात्र उत्सवानिमित्त पिंगळा देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. 10 ऑक्टोबर रोजी रोहनखेड येथील सतीश संजय उमेकर (21), श्रीधर डीगंबर ठाकरे (25) हे दोघे मित्र ओमप्रकाश मुंदाने (रा. विचोरी) याला घेऊन पिंगळादेवीच्या दर्शनासाठी आले होते. दरम्यान चे कापूर तलावाजवळ गेले. त्यावेळी आंघोळ करण्याच्या नादात ओमप्रकाश मुंदाने हा पाण्यात उतरला, मात्र पाण्याचा अंदाज न आल्यामुळे पाण्यात बुडून वाहत गेला. त्यानंतर या घटनेची माहिती शिरखेड पोलिसांना प्राप्त होताच ठाणेदार सचिन लुले यांनी घटनास्थळ गाठले. या ठिकाणी अमरावती येथील बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. बचाव पथकाच्या रेस्क्यू टीमने ओमप्रकाश याची तलावाच्या पात्रात शोधाशोध सुरू केली, मात्र रात्री उशिरापर्यंत त्याचा शोध लागू शकला नाही. त्यामुळे 11 ऑक्टोबर रोजी पुन्हा सकाळी शोध मोहीम सुरू करण्यात आली. त्यानंतर अवघ्या 45 मिनिटात रेक्सु टीमच्या हाती ओमप्रकाशचा मृतदेह लागला. त्यानंतर ओमप्रकाशचा मृतदेह तलावाबाहेर काढून शवविच्छेदनाकरीता रुग्णालयात रवाना करण्यात आले. रेक्सु टीममध्ये सचिन धरमकर, गजानन वाडेकर, दिलीप भिलावेकर, गणेश जाधव, राजेंद्र शहाकार, प्रफुल भुसारी, श्रीकांत जवंजाळ, अमोल साळुंखे, प्रियांशु तायवाडे यांचा समावेश होता.

भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा यांना धमकीचे पत्र

अमरावती, (दि. 11) – माजी खासदार नवनीत राणा यांना एक धमकीचे पत्र मिळाल्याने खळबळ उडाली आहे. या पत्रात त्यांना सामूहिक अत्याचार करण्याची, घरासमोर गाय कापण्याची देखील दिली धमकी देण्यात आली. तसेच पत्राद्वारे 10 करोड रूपयाची खंडणीची मागणी व खंडणी दिली तर पिछा सोडणार असल्याचा उल्लेख करून,

आमिर नावाच्या इसमाच्या नावाचा उल्लेख

नवनीत राणा यांचे पति रवी राणा यांच्या विषयी वादग्रस्त शब्दाचा वापर केला आहे.

मी हैदराबादचा असून कोणत्याही पार्टीचा नाही. माझा भाऊ वसीम हा दुबईतून तुम्हाला कॉल केला, मात्र फोन उचलला नसल्याचा पत्रात उल्लेख आहे. पत्रात फोन नंबरचा देखील उल्लेख आहे. पाकिस्तान जिंदाबाद असाही या पत्रात उल्लेख असून, हे पत्र संबंधित आमिर नावाच्या इसमाने आपल्या पत्नीच्या हाताने लिहिल्या असल्याचा देखील उल्लेख केला आहे. यासंदर्भात खासदार नवनीत रवी राणा यांचे स्वीय सहाय्यक विनोद गुहे यांची राजापेठ पोलिसात तक्रार दीली आहे.

अल्पवयीन मुलीला खुन करण्याची धमकी

अमरावती – अल्पवयीन मुलीची छेडखानी करून तिला खुन करण्याची धमकी दिली. या घटनेची तक्रार पिडित मुलीने 10 ऑक्टोबर रोजी मंगरुळ दस्तगिर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी तेजस ऊर्फ लखन श्रीधर जगताप (28, रा. ता. धामणगाव रेल्वे) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

शहरातील 4 तडीपारांना अटक

अमरावती शहर गुन्हेशाखा युनिट क्र. 2 ची धडक कारवाई

महासागर प्रतिनिधी अमरावती, (दि. 11) – पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी शहरातील अवैध धंद्यांवर तसेच तडीपार, शस्त्र बाळगणार्यावर कारवाई करण्याबाबत निर्देशीत केले आहे. या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने 10 ते 11 ऑक्टोबरदरम्यान पहाटे 5 वाजता दरम्यान कोंबीग ऑपरेशन मोहीम राबवुन चार तडीपारांना अटक केली.

पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात अधिकारी व अंमलदार यांनी कोंबीग ऑपरेशन राबवीत असतांना गुप्त माहीतीवरून शुभम चरण धिमान (28), आकाश शामलाल कैथवास (28), निरज हरीभाउ टेंभुर्णे (41, तिन्ही रा. माताफैल बडनेरा) व शेख सलमान शेख सलील बाली (31, रा. चांदनी चौक, बडनेरा) या तडीपारांना अटक केली.

हे आरोपी तडिपार असताना शहरामध्ये अवैधरित्या वावर करतांना मिळून आले. याप्रकरणात चारही आरोपींविरुध्द बडनेरा पोलिस ठाण्यात कलम 142 महाराष्ट्र पोलिस कायद्याप्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारावकर, सागर पाटील, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखाली युनिट 2 चे एपीआय महेश इंगोले, पीएसआय संजय वानखडे, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमूख, संग्राम भोजने, नईम बेग, मंगेश शिंदे, राजीक रायलीवाले, चेतन कराडे, योगेश पवार, निलेश वंजारी, सागर ठाकरे, संदीप खंडारे, चेतन शर्मा, राहुल दूधे यांनी केली आहे.

शहरात ऑनलाईन शस्त्र खरेदीस प्रतिबंध

ऑनलाईन शस्त्रांची विक्री करणाऱ्या कंपन्यांना नोटीस

महासागर प्रतिनिधी अमरावती, (दि. 11) – अमरावती शहरात काही ई कॉमर्स प्लॅटफॉम असणार्या फिल्पकार्ट, ॲमेझॉन, शापक्लुज डॉट कॉम इत्यादी कंपन्यामध्ये धारधार शस्त्रे, जी गुन्ह्यामध्ये वापरले जाऊ शकतात, अश्या प्रकारच्या शस्त्रांची विक्री त्यांचे

ऑनलाईन साईटसवरुन करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या शस्त्र विक्रीस प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी फौजदारी प्रकीया संहीता 1973 कलम 144 प्रमाणे आदेश 11 ऑक्टोबर रोजी पारीत केला आहे.

तिक्ष्ण धार असलेल्या प्राणघातक शस्त्राच्या पात्याची लांबी 9 इंचापेक्षा जास्त किंवा ज्याचे पात्याची रुंदी 2 इंचापेक्षा जास्त आहे. हे शस्त्र बाळगणे भारतीय हत्यार कायदा कलम 4 सहकलम 25 अन्वये दखलपात्र गुन्हा होते. त्यामुळे अश्या शस्त्र विक्रीवर अमरावती शहरात बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच वर नमुद शस्त्रे वगळता म्हणजे ज्यांची लांबी 9 इंचापेक्षा कमी व रुंदी 2 इंचापेक्षा कमी असलेल्या शस्त्रांची ऑनलाइन खरेदी करण्यार्या अमरावती शहरातील ग्राहकांची विस्तुत तपशीलासह माहीती अमरावती शहर पोलीस यांना वेळोवेळी पुरवीणेबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. सदरचा आदेश अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत येणार्या सर्व पोलीस ठाण्यातील परीसरात निर्गमित झालेपासुन पुढील 60 दिवसापर्यंत लागु असणार आहे. संव ऑनलाईन शस्त्रांची विक्री करणार्या कंपन्यांना सदरची नोटीस देण्यात आलेली आहे.

आपटा व शमी : दसरा सणाचे मुख्य आकर्षण व धार्मिक महत्व प्राप्त वृक्ष

महासागर प्रतिनिधी अंजनगाव सुर्जी, (दि. 11)– नवरात्रानंतरचा दुसरा दिवस म्हणजे विजयादशमी यास दसरा देखील म्हणतो. या सणाचे मुख्य आकर्षण म्हणजे या दिवशी लोक आपटा किंवा भोसा व शमी या वृक्षाची पाने एकमेकांना भेटून देतात. आपटा या वृक्षाचे शास्त्रीय नाव बाहुनिया रेसिमोसा असून हे सिझलपिनेसी या कुळातील आहे याला अमरावती व यवतमाळ भागामध्ये भोसा व आपटा देखील म्हणतात.

शमी या वनस्पतीचे शास्त्रीय नाव प्रोसोपीस सीनेरारिया हे असून बाभळीच्या या कुळातील आहे. यास हिंदीमध्ये छोंकर म्हणतात. हा वृक्ष राजस्थान व तेलंगणाचा राज्यवृक्ष असून राजस्थानमध्ये यास 'खेजडी' म्हणतात. पापनाशनी, अजप्रिया ,अग्नीगर्भा या वेगवेगळ्या नावाने शमीला ओळखल्या जाते. आपटा हा एक लहान वृक्ष असून याचे मुख्य आकर्षण म्हणजे याची पाने याला मार्च ते जुलै

दरम्यान फुले येतात. याच्या फुलांकडे बहुतांशी लोक लक्ष देत नाहीत कारण ती हिरवट रंगाची अगदी लहान लहान असतात त्याचा वापर खाण्यामध्ये भाजी म्हणून केल्या जातो. याच्या कोवळ्या पानाची व फुलाची भाजी विविध क्षेत्रातील लोक खात असल्याने याची एक रानभाजी म्हणून देखील ओळख आहे. याच्या पानांचा वापर मलेरिया, खोकाला, युरिनेशन, मासिक पाळी इत्यादीच्या आजारावर वापर केल्या जातो.या वृक्षाचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे याला प्राप्त झालेले धार्मिक महत्व. याचा दसऱ्याच्या दिवशी सोने म्हणून वापर करतात.पूर्वी विद्यार्जनांसाठी राज कुळातील राजपुत्र गुरूंच्या आश्रमात राहत असत. तिथे त्यांना विविध विद्या शिकवल्या जायच्या. असाच एक राजा कौत्स याने त्याचे गुरू वरतंतू यांच्याकडून विद्या प्राप्त केली. कौत्स राज्याला वाटले की आपण आपल्या गुरूला गुरुदक्षिणा द्यावी तसे त्यांनी आपल्या गुरूला विचारले असता वरतंतू यांनी गुरुदक्षिणा घेण्यास नकार दिला. तरी कौत्स राजांनी खुप आग्रह केल्यामुळे त्यांनी त्याला 14 करोड(कोटी) सोण्याची नाणे दक्षिणा स्वरूपात देण्यास सांगितले परंतु कौत्स राज्याकडे एवढी नाणे नसल्यामुळे त्यांने अयोध्या मधील रघुराजा यांचेकडे धाव घेतली व मदत मागितली मात्र रघुराजाने नुकताच यज्ञ करून सर्व संपत्ती दान केलेली होती त्यामुळे त्यांच्याकडेही पर्याप्त सुवर्ण मुद्रा नव्हत्या. परंतु मदत मागायला आलेल्यांना नाही म्हणे हे रघुराज्याच्या तत्वात बसत नसल्याने त्याने कौत्सला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. कौत्स राजाला दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी रघुराजाने कुबेरावर स्वारी केली पराक्रमी रघुराजा याचा पराभव करणे अशक्य असल्याने कुबेराने रघुराजास हवी तेवढी संपत्ती देण्यास कबुल केले त्यानुसार कुबेराने रात्री धनवर्षाव केला हे सर्व सुवर्ण मुद्रा एका आपट्याच्या झाडावरून जमिनीवर खाली पडल्या. अशी आख्यायिका आहे.

दसऱ्याला शमी व आपट्याची तोड मोठ्या प्रमाणात केल्या जाते व याची पाने बाजारात विकल्या जातात. या वनस्पतीचे धार्मिक व औषधी महत्व जाणून घेऊन याची पुजा करण्याबरोबरच यांचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या धार्मिक, औषधी व पर्यावरणीय महत्त्व असलेल्या वृक्षाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी व त्याचा वारसा जोपासण्यासाठी डॉ.प्रभा भोगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली वारसा एथनिक नॉलेज हेरिटेज सोसायटी, अंजनगाव कार्य करीत आहे.

-डॉ. मंगेश जगतराव डगवाल
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख वनस्पतीशास्त्र विभाग, श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती.

अकारण पायउतार, अनेकांनी सोडली 'तुतारी'

विधानसभेच्या तोंडावर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला भगदाळ

महासागर प्रतिनिधी अमरावती, (दि. 11) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जिल्हाध्यक्ष प्रदीप राऊत यांचा पदावरून पायउतार केल्यामुळं नाराज पदाधिकाऱ्यांनी बंड केले आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गुरुवारी अमरावती जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिलेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अमरावती जिल्हाध्यक्ष प्रदीप राऊत यांच्याकडे लोकसभा निवडणुकीत अमरावती आणि वर्धा लोकसभा मतदार संघाची प्रमुख जबाबदारी होती. मात्र ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांना जिल्हाध्यक्षपदावरून काढून त्यांच्यावर प्रदेश संघटन सचिव ही नवी जबाबदारी देण्यात आली. विश्वासात न घेता आपल्याला पदावरून काढलं, अशी नाराजी प्रदीप राऊत यांनी व्यक्त केली.

पाच महिन्यात आम्ही पक्ष संघटना मजबूत केली नव्या नेतृत्वाची फळी उभी केली, असं असताना कुठलंही कारण न देता किंवा चर्चा न करता आपल्याला पदावरून काढून टाकलं. हा आपल्या पक्षनिष्ठेचा व कार्याचा अवमान असल्यामुळं आपण प्रदेश संघटना सचिव पदाचा राजीनामा देत आहोत, असं प्रदीप राऊत यांनी सांगितलं. प्रदीप राऊत यांच्यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेस सेवा दलचे जिल्हाध्यक्ष किशोर बर्डे सामाजिक न्याय विभागाचे सुनील कीर्तनकार आदी पदाधिकाऱ्यांनी देखील राजीनामे दिलेत. आपल्याला जिल्हाध्यक्ष पदावरून काढून टाकण्याचा जो काही निर्णय घेण्यात आला, त्यासाठी पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष सुनील वऱ्हाडे, विधानसभेचे माजी उपसभापती शरद तसरे, प्रकाश बोंडे हे नेते जबाबदार असल्याचा आरोपही प्रदीप राऊत यांनी केला. पक्ष वाढीसाठी शून्य कर्तृत्व असणाऱ्या या नेत्यांनी वरिष्ठांची कान भरणी केली, असं देखील प्रदीप राऊत यांनी म्हटलं आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

अमरावती मध्ये जनसन्मान यात्रा सोहळा उद्या

उपमुख्यमंत्री अजित पवारांची राहणार उपस्थिती

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाठपुराव्याने अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील वर्ष 2024 मध्ये नवीन वाढीव कर आकारणी व वसुलीला शासनाकडून स्थगनादेश मिळाला. तसेच शहरातील मालमत्ताधारकांना जुन्या कर प्रणालीनेच कर लागू करून बिले पाठविण्याची कार्यवाहीबाबत महापालिका आयुक्तांना आदेशानंतर अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. अमरावती विधानसभा मतदार संघासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोट्यावधींचा भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. जनसन्मान सोहळ्याला अमरावतीकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सुद्धा आ.सुलभा खोडके यांनी पत्रकार परिषदेतून केले.

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.11) - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार हे जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने अमरावती येथे येत आहेत. त्यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात रविवार 13 ऑक्टोबर 2024 रोजी संत गाडगेबाबा समाधी मंदिर समोरील प्रांगण, गाडगे नगर अमरावती येथे दुपारी 1.30 वाजता जनसन्मान यात्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

एका पत्रकार परिषदेतून कार्यक्रमाच्या आयोजनाची माहिती देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जनसन्मान यात्रा सोहळा अमरावतीचे संयोजक संजय खोडके यांनी सांगितले की, अमरावतीच्या विकासाला बळकटी व नवी दिशा देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोट्यावधींचा भरीव निधी उपलब्ध करून दिल्याने आज अमरावती विधानसभा क्षेत्रात अनेक विकास कामे मार्गी लागली आहेत. तसेच सरकारमध्ये असतांना जे काही धोरणात्मक निर्णय घेतले त्याचा सुद्धा अमरावतीला पुरेपूर लाभ झाला आहे. म्हणूनच अजित पवार यांचे आम्ही स्वागत व सत्कार करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलतांना राकॉ नेता संजय खोडके यांनी सांगितले की, 35 वर्षाच्या राजकीय व सामाजिक कारकिर्दीत त्यांनी जनतेच्या हिताला प्राधान्य देऊन अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. त्यामुळे योजनांपुरती यात्रा मर्यादित न राहता समाज घटकांना काय अपेक्षित आहे, त्यांच्या नेमक्या काय भावना आहे. हे देखील जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून जाणून घेण्यात येत आहे. संपूर्ण राज्यभरात जनसन्मान यात्रेला जनतेचा अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभत आहे. आता ही जनसन्मान यात्रा अंतिम टप्यात असून अमरावती मधील यात्रेच्या निमित्ताने आम्ही त्यांचे स्वागत व सत्कार करीत आहोत. या साठी संत गाडगे बाबा समाधी मंदिर समोरील प्रांगणात भव्य डोम साकारून जवळपास 20 हजार लोकांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

रविवार 13 ऑक्टोबर रोजी अजित पवार यांचे शहरात आगमन होताच सर्वप्रथम राजमाता माँ साहेब जिजाऊ स्मारक आरटीचौक येथे पुतळ्याला अभिवादन, तेथून इर्विन चौक स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा, नंतर पंचवटी चौक स्थित कृषी महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा पुतळा व तेथून संत गाडगेबाबा समाधी मंदिर येथे अभिवादन केल्या नंतर अजित पवार यांचे दुपारी 1.30 वाजता जनसन्मान यात्रा सोहळाच्या विशाल मंचावर आगमन होणार आहे. असे सुद्धा संजय खोडके यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले. अमरावतीमधील जनसन्मान यात्रेची तयारी पूर्ण झाली असून आयोजनाला घेऊन सहकाऱ्यांच्या छोट्या- छोट्या समिती स्थापन करून जबाबदारी देण्यात आली आहे. शासकीय तंत्रनिकेतन अमरावती, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय (रूरल) येथे वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

स्मशानभूमी जवळील मास विक्रेत्यांचे अतिक्रमण काढले

महासागर प्रतिनिधी

चांदूर रेल्वे,(दि.11)- शहरातील स्मशानभूमी जवळील अतिक्रमण काढल्यामुळे मटन, चिकन व मच्छी विक्रेत्यांना आपली दुकाने बंद करावी लागली. त्यामुळे आता त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न उपस्थित झाला असुन त्यांना अद्यापही योग्य पर्यायी व्यवस्था नगरपरिषदकडून उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचे विक्रेत्यांनी म्हटले आहे.

चांदूर रेल्वे शहरातील आठवडी बाजारातील मासविक्रेत्यांची दुकाने नगरपरिषदेने काही वर्षांपूर्वी उठविल्यामुळे सदर विक्रेत्यांनी शहराबाहेरील स्मशानभूमीजवळ रस्त्याच्या बाजुला आपली दुकाने लावली होती. मात्र आता काही लोकांच्या तक्रारीनंतर या ठिकाणची दुकाने सुध्दा उठविण्यासाठी नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संयुक्त विद्यमाने काही दिवसांपूर्वी मोहीम हाती घेण्यात आली. आता येथून सुद्धा दुकाने हटविल्याने चिकन, मटन व मच्छी विक्रेत्यांनी नेमकी दुकाने कुठे लावायची ? असा सवाल उपस्थित झाला आह. शहराबाहेर गेल्यानंतर सुद्धा तेथूनही त्यांना हटविण्यात आले, अशामुळे त्यांच्या कूटूंबाचा उपजिविकेचा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे. नगरपरिषदेने त्यांना योग्य पर्यायी जागा उपलब्ध करून देणे गरजेचे असतांना याकरिता नगरपरिषदकडून अद्याप कुठल्याही हालचाली झाले नसल्याची माहिती सूत्रांद्वारे मिळाली आहे.

अन्यथा पुन्हा तेथेच दुकान थाटू

आमची मच्छीची दुकाने रोडच्या दुसऱ्या बाजूने आहे. या ठिकाणची कुठलीही तक्रार नसतांना सुद्धा अतिक्रमण मोहीममध्ये आमचीही दुकाने हटविण्यात आली. आधीच तर चांदूर रेल्वे शहरात मास विक्रेत्यांचे मार्केट नसल्यामुळे आम्ही शहराबाहेर दुकाने लावून आमची उपजीविका कशीतरी भागवीत आहो आणि आता आम्हाला चांदूर रेल्वे शहराबाहेर सुद्धा त्रास दिल्या जात आहे. काही महिण्यापुर्वी मी दसरा मैदानात दुकान लावले असता तेथे सुध्दा नागरिकांचा विरोध होता व तेथे सफाई नसुन मोठमोठी झाडे आहे. त्यामुळे आता आम्हाला एक ते दोन दिवसांत नगर परिषदने योग्य पर्यायी जागेची व्यवस्था करून द्यावी, अन्यथा आम्ही मच्छी विक्रेते त्याच ठिकाणी पुन्हा दुकान लावू.

सुरेश तायडे,
मासे विक्रेता, चांदूर रेल्वे.

दसरा मैदानात दुकाने लावावी - मुख्याधिकारी

मास विक्रेत्यांकरिता पर्यायी जागा म्हणून दसरा मैदान येथे दुकाने लावण्यासंदर्भात त्यांना आवाहन करण्यात आले आहे.

डॉ. विकास खंडारे, मुख्याधिकारी.

चांदूरचे रेल्वे स्टेशन झाले 143 वर्षांचे, ग्रीन स्टेशनमध्ये रूपांतर

स्टेशनचा वाढदिवस केला साजरा

महासागर प्रतिनिधी

चांदूर रेल्वे,(दि.11)- रेल्वे दिवसेंदिवस प्रगतीपथावर धावत आहे. कोळशाच्या इंजन पासून तर आता वंदेभारत पर्यंत रेल्वेचे नवीन अविष्कार पोहचले आहे. रेल्वेची छबी, प्रगती याला गर्वांकित करण्याचे कार्य प्रत्येक कर्मचारी करीत आहे. ज्या रेल्वेने त्यांना एक ओळख दिली त्या रेल्वेच्या स्टेशनचा जन्मोत्सव चांदूर रेल्वे शहरातील रेल्वे स्टेशनवर स्थानिक कर्मचारी व शहरवासीयांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. 143 वर्षानंतर चांदूर रेल्वे स्टेशनला आता 'ग्रीन स्टेशन' च्या नावाने नवीन ओळख मिळाली आहे.

1867 मध्ये नागपूर - मुंबई रेल्वे सेक्शन सुरू झाले होते. व यानंतर 1881 मध्ये चांदूर रेल्वे स्टेशन हे उदयास आले. म्हणजे चांदूर रेल्वे स्टेशनला एकूण 143 वर्ष हे पूर्ण झाले आहे. चांदूर रेल्वे शहरातील स्टेशनचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी स्टेशन प्रबंधक दीपिका बाजपेयी यांनी वरिष्ठ व गणमान्य नागरिकांना निमंत्रित केले होते. यावेळी रेल रोको कृती समितीचे अध्यक्ष नितीन गवळी, सदस्य मेहमूद हुसेन, विनोद जोशी, वासुदेव वातकर, अ.भा. ग्रा. पत्रकार संघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान, तालुकाध्यक्ष राजीव शिवणकर, रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य डॉ. वसंत खंडार, बाळासाहेब सोरगिवकर, विजय मिसाळ, शहरवासी प्रदीप जैन, युवराज खेरडे, दिलीप मोहनानी, सुमेरचंद जैन, गुड्डू बजाज आदींची उपस्थिती होती. उपस्थितांनी रेल्वेशी जुळलेल्या अनेक आठवणींना उजाळा दिला. काही वर्षांपुर्वी चांदूर स्टेशनवरून मोठ्या प्रमाणावर रेल्वेमार्गे कापसाची निर्यात केली जात होती, त्यामुळे कापूस गिरण्या बांधल्या गेल्या होत्या व रोजगार उपलब्ध झाला होता. तसेच खाण्याचे पान जवळपासच्या गावातून आणून रेल्वेने पाठविल्या जात होते. त्यामुळे रेल्वेला एक वेगळा मालधक्का त्याकाळी तयार करावा लागला होता. मात्र आता गिरण्या बंद झाल्या असुन मालधक्का सुध्दा धामणगावला शिफ्ट करण्यात आला.

अशी जुनी माहिती उपस्थितांनी यावेळी दिली. यानंतर उपस्थितांच्या हस्ते केक कापून रेल्वे स्टेशनचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम वर्धाचे रेल्वे कमर्शियल इन्स्पेक्टर दीपक शाहू यांच्या सहकार्याने संपन्न झाला. या कार्यक्रमाला स्टेशन कर्मचारी देवेश बाजपेयी, दीपिका बाजपेयी, अमोल पगारे, सिद्धार्थ शेंडे, विकास लोखंडे, अफरोज खान, अजिंक्य बारले, अजय खरकटे, प्रशांत मेंढे, अरविंद कुमार, मनोज बुंदिले, मनोज पाटील, मनोज ढोकणे, नरेंद्र धंदर, अरुण वाघ यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

दुचाकी दुभाजकावर आदळून एकाचा मृत्यू

अमरावती - रस्त्यात श्वान आडवे येऊन अनियंत्रीत झालेली दुचाकी दुभाजकावर धडकल्याने एकाचा मृत्यू झाला, तर एक जखमी झाला. ही घटना 10 ऑक्टोबर रोजी रात्री खोलापुर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शिंगणापूर फाट्याजवळील धाब्याजवळ घडली. रवि विजय चोरपगार (18) असे मृताचे नाव आहे. या घटनेची तक्रार पोलिस हवालदार सतीष बाबाराव डहाके यांनी 11 ऑक्टोबर रोजी खोलापुर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी ईंद्रजीत ऊर्फ नागेश श्रावण जांभोरे (21, रा. वरुड) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

पती-पत्नीवर चाकू हल्ला

अमरावती - मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी 40 वर्षीय महिला रोजगार हमी योजनेची कागदपत्रे घेऊन घरी जात होती. यावेळी आरोपी गणपत महादेव कंगाळे याने तिच्याशी वाद घातला. आरोपीची समजूत घालण्यासाठी महिलेने पतीला आणले असता गणपतने पतीवर चाकूने हल्ला केला. महिला वाचविण्यासाठी गेली असता तिच्या हातावर चाकू लागला. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गणपतविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अभियंता कुणाल पिंजरकर यांना निरोप

नवनियुक्त अभियंता प्रमोद वानखडे यांचे स्वागत

महासागर प्रतिनिधी

परतवाडा, (दि.11)- अचलपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कुणाल पिंजरकर यांची बदली झाल्याने त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, तर नवनियुक्त अभियंता प्रमोद वानखडे यांचे स्वागतही यावेळी करण्यात आले. आदिवासी पर्यावरण संघटना, मानव सेवा समिती, शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीचे प्रमुख पदाधिकाऱ्यांकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तहसीलदार संजय गरकल या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

प्रमुख अतिथि म्हणून उप कार्यकारी अभियंता अचलपुरचे अभयकुमार बारब्दे, चांदूर बाजार मधून उप कार्यकारी अभियंता भेंडे, गजु कोल्हे, संजय सिन्हा, एस.बी.बारखडे, डॉ.दिपक गुलहाने, उपकार्यकारी अभियंता नवघरे, दीपा तायडे, योगेश खानझोडे मंचकावर उपस्थित होते. यावेळी आपल्या मनोगत मधून कुणाल पिंजरकर यांनी आपले विविध अनुभव मांडले, तर प्रमोद वानखडे यांनी सत्काराबद्दल आभार व्यक्त केले. तर अध्यक्षीय मनोगत मधून तहसीलदार संजय गरकल यांनी कार्याची पावती म्हणजे निरोप समारोह मत व्यक्त केले. अनिरुद्ध बिरादर, राजेन्द्र पांडेकर, राजेन्द्र पखाले, संतोष मेटकर, शैलेश वैद्य, शुभम नाडगे, ठवकर बाबू, शंकर सवलकर, आर परवाले, शुभम गाडबैल, विवेक लष्करी, विशाल खडसे, विवेक प्रजापति, निखिल बडगे, निशांत भुजाडे यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महापालिका कर्मचाऱ्याचा संप मिटला

अमरावती- अमरावती महानगरपालिका मुख्यालय आणि झोन क्र. 1 ते 5 मधील सर्व कार्यरत अधिकारी, कर्मचारी/स्वच्छता कर्मचारी आणि सर्व सेवानिवृत्त कर्मचारी हे 8 ऑक्टोबरपासून संपावर होते. गुरुवारी माजी महापीर विलास इंगोले यांच्या मध्यस्थीने प्रहार कर्मचारी व संघटनेच्या सदस्यांनी महापालिका आयुक्तांशी महापालिकेच्या दालनात चर्चा केली. दुपारी झालेल्या चर्चेत महापालिका आयुक्तांनी संघटनेच्या सर्व मागण्या मान्य केल्यानंतर संघटनेने सायंकाळपासून संप मागे घेतला आहे.

वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.11)- विज अंगावर पडून एका शेतकर्याचा मृत्यू झाल्याची घटना धामणगाव रेल्वेतील एका गावात गुरुवारी घडली. संतोष दुलीचंद शर्मा (67) असे मृत शेतकर्याचे नाव आहे.

नूतन चौकात राहणारे संतोष दुलीचंद शर्मा हे नेहमीप्रमाणे हिरापूर येथील आपल्या शेतात गेले होते. शेतीमध्ये सोयाबीन पीकाची कापणी सुरु होती. अशातच सायंकाळी सहा ते सात वाजता दरम्यान हवामानात अचानक बदल झाला. आकाशात वीजेचा प्रचंड गडगडाट सुरू झाला. त्यावेळी संतोष शर्मा हे घरी परतत असताना अचानक वीज पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. उशीर होऊनही संतोष हे घरी न परतल्याने त्याचे कुटुंबीय त्याचा शोध घेण्यासाठी गेले. तेव्हा संतोष एका ठिकाणी जमिनीवर पडून असल्याचे दिसले. त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

भातकुलीची महाराणी

भातकुली - श्री महर्षी वाल्मिकी चौक भातकुली श्री महर्षी वाल्मिकी नवदुर्गा उत्सव मंडळाला 38 वर्ष झाले आहे. दरवर्षी विविध कार्यक्रम देखावे हे या मंडळाचे वैशिष्ट्य आहे. भातकुली शहरातील बहुसंख्य लोक या उत्सवात भाग घेऊन नवरात्रीतील नऊ दिवस साजरे करतात. किर्तन तसेच समाज प्रबोधनकार व विनोदी कार्यक्रमाची मेजवानी, कर्तबगार स्त्रीयांचा सत्कार, विविध शेत्रातील स्त्रीयांचे सत्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, नविन निवड झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार, विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येते या निमित्ताने भक्तांना या ठिकाणी घेता येते. यावर्षी हे सिंहासनावर देवीचे रूप भक्तांसाठी आकर्षण ठरत आहे. **(छाया- विक्रांत खेडकर भातकुली)**

पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळ मंजुर

अ.भा. ग्रा. पत्रकार संघाच्या मागणीला यश

महासागर प्रतिनिधी

चांदूर रेल्वे,(दि.11) - राज्यातील पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय गुरूवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. पत्रकार, तसेच वृत्तपत्र विक्रेंत्याच्या कल्याणासाठीच्या विविध योजना या महामंडळांमार्फत चालवण्यात येतील. या दोन्ही घटकांची महामंडळ स्थापन करावी, अशी आग्रही मागणी अखिल भारतीय ग्रामिण पत्रकार संघाची अनेक वर्षांपासूनची होती. कॅबिनेट बैठकीच्या या निर्णयाचे अ.भा.ग्रा. पत्रकार संघाने स्वागत केले आहे.

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारांना कल्याण योजना, जाहिराती वितरण, अधिस्विकृती, सन्मान योजनांचे सुलभ आणि पारदर्शक पध्दतीने लाभ मिळावेत, पत्रकारांच्या मागण्यांच्या मागण्यांवर शिघ्रगतीने निर्णय होऊन उतारवयातील ज्येष्ठ पत्रकारांना सन्मानयोजनेतील निवृत्ती वेतन योग्य वेळेत मिळावे, तसेच ईतर सामाजिक साधनेत आपल्या लेखण्या झिजवणाऱ्या सर्वच पत्रकारांना पात्रतेनुसार वेळीच न्याय मिळावा यासाठी पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी वेगवेगळी स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याची मागणी अ. भा. ग्रा. पत्रकार संघ (भारत) कडून गेल्या वर्षांपासून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्र्यांकडे सातत्याने सुरू होती. तसेच दिनांक 4 जानेवारी 2024 देवाशिष लॉन, जळगांव (जामोद) येथील अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनातील ठरावामध्ये ही महामंडळे स्थापनेची मुख्य मागणी होती. राज्य अधिस्वीकृती समीतीचे राज्य अध्यक्ष यदु जोशी हे अधिस्वीकृती समीतीचे अध्यक्ष झाल्यानंतर अमरावती येथील प्राईम पार्क हॉटेल वरील सत्कार समारंभात पत्रकारांच्या विषयावरील निवेदनात मडामंडळाची मागणी केली होती व या मागण्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन सुध्दा त्यांनी दिले होते. यानंतर गुरूवारी झालेल्या कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत एकुण 80 निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये पत्रकार महामंडळ आणि वृत्तपत्र विक्रेता महामंडळ अशी दोन स्वतंत्र मंडळाच्या निर्मितीला राज्यशासनाची मंजुरात मिळाली आहे. या निर्णयातून पत्रकारांनाही न्याय देण्याचा एक ऐतिहासिक निर्णय राज्यशासनाने घेतला आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्री यांचे अ. भा. ग्रा. पत्रकार संघाकडून आभार मानण्यात आले आहे.

आणखी एक अनोळखी मृतदेह आढळला

अमरावती- बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नवीवस्ती स्थित पवननगर रोडवरील राजेश्वरी हायस्कुलजवळ एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. ही घटना 9 ऑक्टोबर रोजी सकाळी 11.30 वाजताच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणात बडनेरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. दोन दिवसांपूर्वीही एक अनोळखी इसमाचा कुजलेला मृतदेह आढळून आला होता. पुढिल तपास बडनेरा पोलीस करीत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, अमरावती
e-mail ID :- eemjpdivamt@gmail.com Ph. No. 0721-2550538

ई-निविदा सुचना क्र. ४० सन २०२४-२०२५

कामाचे नांव :- अमरावती पाणी पुरवठा योजना (देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत सिंभोरा हेडवर्क्स येथे वार्षिक देखभाल व दुरुस्ती करीता विद्युत अभियंता, पंपचालक, विजतत्री, हेल्पर व मजदुरची सेवा पुरविणे बाबतचे एका कामाची निविदा मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग, अमरावती यांचे कडून बी-१ पद्धतीने मागविण्यात येत आहेत. कामा संबंधीचा सविस्तर तपशिल दिनांक १४-१०-२०२८ ला १६.०० वाजे पासुन विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्ड व महाराष्ट्र शासनाच्या ई टेंडर संकेतस्थळ https://mahatenders. gov.in/ nicgep/app वर उपलब्ध राहील.

(विवेक सोळंके)
कार्यकारी अभियंता

विमाका/अम./जाही./688/२०२४-२५